म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. १४९
१८८२

१५० काव्य

...रूप

होळकरीण

...र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक १४९
लेखक
पुस्तकाचें नांव अहिल्याबाई होळकर
सन १८८२

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ५५
ठाणें सन १८९४

# अहिल्याबाई होळकरीण इचें चरित्र.

## मंगलाचरण.

श्लोक (वसंततिलका)

आदौ गणेश गणनायक विघ्नहर्ता ॥
प्रार्थीतसें विनवुनी तुज एकदंता ॥
हे शंकरात्मज गजानन ज्ञान मूर्ती ॥
देबुद्धि ग्रंथ वदण्या आणि देइस्फूर्ती ॥१॥

( भुजंगप्रयात )

जगीं वर्णिला तोहि गौरी कुमार ॥
तया वंदितों मी असें नम्र फार ॥
जयाचा दिसे तो करायुक्त भाळ ॥
शिरीं टोप ज्याच्याही दूर्वा विशाळ ॥२॥
असें मूढ मीही अती मंदवाणी ॥
दयाभूत तूतें वदे वेदवाणी ॥
सदां भक्त वांचोहि तुझ्या दयेनें ॥
वदों ग्रंथ मी हा तुझेची कृपेनें ॥३॥

तुला वंदितों शारदे देवि माते ॥
करी ग्रंथ बोलावया पात्र मातें ॥
कृपेनें तुझ्या पंगु लंघी नगातें ॥
श्रुती शास्त्र ही कीर्ति वंदून गातें ॥४॥

श्लोक ( कामदा )

धात्रकन्यके भक्त पालके ॥
ताप वारके तुष्टि कारके ॥
वंदितों तुला दासकामदे ॥
बुद्धि दे वदूं वृत्त शारदे ॥५॥

---

# सज्जनांची प्रार्थना.

साक्या

अवगत नाहीं प्राकृत भाषा, नसे संस्कृत संस्कार ॥
तथापि करितसें पद्यरचना, येतील दोष अपार ॥६॥
परंतु सूज्ञीं दया करावी, जोडितों करद्वयास ॥
यातची असती गुण जे कांहीं, आणावेहि उदयास॥७॥
बालक उक्ति स्पष्टचि नसती, तातें बहु मानावी ॥
तेवी माझी प्राकृत वाणी, सुज्ञांहीं परिसावी ॥८॥

---

# अहिल्याबाईचें वर्णन.

**आर्यागीति**

अहिल्याबाई नामें, परम साध्वि इच्या लिहितसें
चरित्रास ॥
होळकर घराणीं हो, ऐकुनि वृत्तांत सज्जनां
नहो त्रास ॥ ९ ॥

**दिंड्या**

भरतखंडीं तो, वीरश्रेष्ट झाला ॥
नामत्याचेंची, ठावकें जनाला ॥
ह्मणती होळकर, मल्हार तयाला ॥
स्नुषा त्याची हे, अहल्या सुशीला ॥१०॥
रूप संपन्ना, गुणायुतागाजी ॥
भूत मात्रींही, करी दया होजी ॥
पातिव्रत्यतें, नांदे तिजमाजीं ॥
काय वर्णूं निज अल्पबुद्धि माझी ॥ ११ ॥

**साकी**

बद्रिके द्वारापासुनी तो, रामेश्वरींहि जिचा ॥
आबाल वृद्ध ते हो जाणति, आहे लौकिक साचा ॥१२॥

**श्लोक ( स्रग्धरा )**

इंदूर ग्राम ऐसें वदाति जन जिचें स्थान हें पुण्य
राशी ॥ तेथें राज्यासनीं ती वसाति निशिदिनीं ठेवुनी

प्रीति दासीं ॥ तत्साम्यासी नसे हो बहु म्हणाति जनीं नाहल्याही स्त्रिया ती ॥ जैसा रक्षीत लोकांजनक स्वशिशुसी राक्षि तैसेंच रीती ॥ १३ ॥

साक्या ( रूपवर्णन )

अहिल्या सतीचें स्वरूप होतें साधारण परिसाजें ॥
सुंदर ते कुरळ केंस केतक नागफडा वरि साजे ॥ १४ ॥
भाळ विशाळा मृगनयना ते नाकीं नथ सरजाची ॥
हिरे जडित कोंदण काम तिला झळकतसे प्रभा ज्याची १५
कर्णफुलें हीं बुगडया वाळ्या काप तियेचे कानीं ॥
मौक्तिक सांकळ्या विराजित त्या शोभत मुख तें त्यांनीं ॥ १६ ॥
सुस्वरूप शामकांती जीची काजळ कुंकू ल्याली॥
गळां तेजःपुंज मुक्तिहार सरी ठुसी ही ल्याली ॥ १७
हिरवी गार वुट्टेदारची आंगीं ती कांचोळी ॥
उरस्थळ तें भरींव त्यावरी कुंभाकार कुच ओळी ॥ १८ ॥
हातीं तीचे गोट पाटल्या तोडे हे बाजुबंद ॥
पायीं तोडे शिंदेशायी मासोळ्या आणि गेंद ॥ १९ ॥
जरी शालू सिंहकटीवरी तेज विराजित शोभे ॥
ऐशी आभरणांनीं सुंदरा देवांगनाचि शोभे ॥ २० ॥

---

# कीर्तिवर्णन.

दिंडी

सर्व ठायीं लौकिक असे कैसा ॥

 मराठी ९८०

नाम नाहीं ठावकें कोणि ऐसा ॥
नसे प्राणी मिळणार भरत खंडीं ॥
ह्मणुनि घेतें मन वर्णनींच गोडी ॥२१॥

आर्या (गीति)

जीं जीं पुण्य क्षेत्रें असतीं तेथें तिचेंही सत्कृत्य ॥
नाहीं ऐसें कोठें स्थान नच मिळणार पाहतां सत्य २२॥

साक्या

कोठें घालुनी अन्नछत्रें कोठें हि सदावर्तें ॥
घाली, देवस्थानें कोठें तलाव तेही वर्तें ॥२३॥
कोठें धमार्थ शाळा बांधि जलसत्रें तीं घाली ॥
कोठें, ती जगु वाटे केवळ धर्ममूर्ति अवतरली ॥२४

आर्या ( गीति )

त्या साध्वीचा होता, पुत्र मालिराव या नांवें ॥
जन्मुनि सत्कुलिं तोहि, करुनी दुष्कृत अकीर्तितें
पावे ॥ २५ ॥

साक्या

ब्रह्मद्वेषी पुत्र निघाला परिसा तद्वृत्तांता ॥
पात्रीं घालुनि कीटक द्रव्यें होय द्विजां अर्पिता ॥२६
कीटकदंशें ब्राह्मण दुःखी पाहुनि तो संतोषी ॥
होतसे सदा, वाटे मजला सत्कुलीं तोहि दोषी ॥२७

---

# शोकवर्णन.

दिंडया

एकूणिसावें वर्ष हो तियेला ॥
दुःख समूह तींवरी शिघ्र आला ॥
पतिवरि दुर्भाग्यें काळ करि घाला ॥
शोक तियेंसिहो अतूल तैं झाला ॥२८॥
तेथपासोनी शुभ्र वस्त्र ल्याली ॥
आरक्त वस्त्रें भूषणें त्यजियेलीं ॥
इतुक्यांताचि पुत्र शोक तिजसि गांठी ॥२९॥
काय वर्णावि दुर्दैव गति गोष्टी ॥
मंचाबाई या नामें तिज कन्या ॥
परम लावण्या सती तेचि धन्या ॥
तये मंचेसी एक पुत्र होई ॥
तयासि त्वरितची दुष्ट मृत्यु नेई ॥३०॥
पुढें जामात शोकें ग्रस्त होत ॥
कन्या तियेची तेही सती जात ॥
काय वर्णावें घोर प्रसंगाला ॥
परि वर्णितसें तया प्रकाराला ॥ ३१ ॥

साकी

दूत मुखें ती ऐकुनि वार्ता माता तेथें जाई ॥
पाहते तंव ती सती जाया सिद्धचि झालीबाई ॥ ३२

दिंड्या

अगे माझे [illegible] लाडके मंचाबाई ॥
नकं [illegible] जाऊं तूं सती हेंचि देई ॥

तुजवीण कंठु मी हिरात कैसी ॥
मजसि तूं दुःखीं लोटुनि कसि जासी ॥ २३॥
प्रथम दिधलें मज दुःख तें प्रियानें ॥
हृदय भग्नही प्रिय पुत्र शोकानें ॥
आतां तूं देसि मजसि दुःख कैसी ॥
मजसि तूं दुःखीं लोटुनि कसि जासी ॥ २४॥

साक्या

मंचाबाई ह्मणे तियेला शोक करूं नको आई ॥
प्रिय पति संगें सती गमन हा योग्य धर्म यासमई ॥२५
नको वारु तूं आई आतां दुःखचि होतें भारी ॥
प्रिया संगें देह जाळुं हा न्हाउनि क्षीप्रातीरीं ॥ २६ ॥
गेला माझा पुत्रचि तोही नाथहि टाकुनि गेला ॥
वांचवुनि ह्या काय करूं मी व्यर्थचि मम देहाला ॥ २७
पुढतीं राहें मीच एकली जाशिल तूंहि त्यागुनी ॥
तेंव्हां होइल शोकान्तचि मज राहुं कसें साहूनी ॥२८
ह्मणुनि करितसें तुझी प्रार्थना आज्ञा दे या समई ॥
सति जाण्यासी या मंचेला वारूं नकोगे आई ॥२९

श्लोक ( भुजंगप्रयात )

अरे ईश्वरा काय अन्याय केला ॥
पती पुत्र कैसा मला अंतरीला ॥
सुता एक होती मनाला विसावा ॥
तिही टाकुनी जातसे एकलीला ॥ ४० ।

## दिंड्या

प्रिये वत्से तूं त्यागुनीहि जाशी ॥
तुझ्या वांचोनी मी होय परदेशी ॥
पती पुत्रानें दुःखिं लोटियेलें ॥
तूंहि तैसेंची मनीं योजियेलें ॥
वदे मंचा मी जाय प्रिया संगें ॥
मला वाराया आडविसी कांगे ॥
मृत्युलोकीं ह्या जाण सौख्य नाहीं ॥
तूंहि माघारी येसी लवलाही ॥

## उमा वृत्त

जीस असें मनीं वाटतसें किं पती विण या जनिं व्यर्थ जिणें ॥ नारि नराविण माननसे तिस केवळ यामिनि इंदुविणें ॥ त्यांतही मी जनिं पुत्रहिना मम मुख न कोणि पहाति जनीं ॥ यास्तव साधन आत्महितीं करि लौकिक कीर्तिच आणि मनीं ४३

## श्लोक (शार्दू० वि०)

माझा अंत निवांत होइल सुखें, कीजे बरा यत्न हा ॥ कांहीं खेद मनीं नको करूं तुला भेटेन स्वर्गीं पहा ॥ काया ही त्यजुनी सतीस पतिचे सेवेसि जाणें बरें ॥ आज्ञादेशि जरी कृपा करुनियां कीर्ति त्रिलोकीं उरे ॥ ४४ ॥

## दिंड्या

बाई वदसि जें, ठावके मला ही ॥
परी माझें मन, गुंतलेंच मोहीं ॥
बाळपणीं किती, प्रेम तुझे ठायीं ॥
तें स्वप्नवत् होय, गे आतां बाई ॥ ४५ ॥
बरें आतां जाणार तरीच जागे ॥
करितसें मी ती सर्व सिद्धतागे ॥
अंतीं मोक्षासी मिळसि काय वानूं ॥
कीर्ति तुझीहिगे मीच काय वर्णूं ॥ ४६ ॥

## सतीवर्णन ( ओव्या )

मग सर्व अहिल्ये समवेत ॥
आप्तवर्ग मिळोनि स्मशानांत ॥
सर्व सिद्धता करुनि त्वरित ॥
मंचे सहित ते पातले ॥ ४७ ॥
अनेक फलयुक्त वायनांनीं ॥
तैसेंचि हरिद्रा कुंकुमांनीं ॥
सप्रेमें सुवासिनी ॥
पुजूनी तृप्त केल्या पैं ॥ ४८ ॥
मग ललाटीं मळवट रेखुनी ॥
नूतन वस्त्र परिधानीं ॥
अलंकार युक्त रत्नांनीं ॥
केलें सुशोभित शरीरतें ॥ ४९ ॥
ऐशा परी ती सिद्ध होऊनी ॥

पतीप्रेत अंकीं घेऊनी ॥
सभोंवार कर्पूर रचोनी ॥
मग, चेतविला कृशान ॥ ५० ॥
ऐशा रीतीं तत्वतां ॥
पती सहीत पावली दग्धता ॥
तेथुनी स्वर्गपंथीं जातां ॥
कीर्ति लोकीं न समाय ॥ ५१ ॥
ऐसा देखोनी दुहितान्त ॥
अहिल्येचे शोका नाहीं अंत ॥
तेथोनि ती हृदय पिटीत ॥
स्वस्थाना पातली ॥ ५२ ॥

श्लोक ( कामदा )

कन्यके मिषें शोक अंबुधीं ॥
मग्न जाहली आहल्या सुधी ॥
शोक नावरे आठवी मनीं ॥
दाखवा म्हणे आत्म नंदिनी ॥ ५३ ॥

ओवी ( एकांत शोक )

पुढें तीन दिवस पर्यंत ॥
बैसे शोकार्णवीं एकांत ॥
अन्नोदकासि नच घेत ॥
शोक अपार मांडिला ॥ ५४ ॥

रा.काव्य
८८



दिंडी

अगे बाले तव दुःख किती साहूं ॥
शोक सागरींहि बुडी किती देऊं ॥
काय ईश्वरें हा जन्म मला दिला ॥
दुःख सागरींच मग्न व्हावयाला ॥ ५५ ॥

साक्या

कोणा संगें कालक्रमणा करूं गे मंचाबाई ॥
पती पुत्राचें दुःख दुःसह तुजवर त्यजिलें बाई ५६
शोकार्णवि मज टाकुनि गेली वत्स जसें धेनूला ॥
हरहर ईशाकुपीं लोटिलें निर्जिवनीं मत्स्याला ॥५७

दिंड्या

पूर्व जन्मीं अपराध काय केला ॥
काय पाडसासि हरणिं विघड केला ॥
काय केला मी साधुचा अपमान ॥
काय अंधासि लोटिलें कुपीं जाण ॥ ५८ ॥
झाला मजपासुनो कवण व्रत भंग ॥
कीं दुर्भाषणीं साधु हृदय भंग ॥
कीं झाला सज्जन पंक्तिभेद काय ॥
ह्मणुनी दुःखानळ भाजितसे काय ॥ ५९ ॥
नजाणें मानिला हरिहरांत भेद ॥
कीं केला हरिकीर्तनीं रंग छेद ॥
कीं पात्रीचा मीं क्षुधित उठविला ॥
ह्मणुनि कन्येचा शोक मला झाला ॥ ६० ॥

कीं केला तो परद्रव्य अभीलाष ॥
कीं घडलासे मज गुरुद्रोह दोष ॥
कीं दवडियेला याचक तृप्तिहीन ॥
कीं मीच पातकी दुष्ट दैव हीन ॥ ६१ ॥

---

## प्रजाजनांची विनंती.

श्लोक ( भुजंगप्रयात )

सचीवादि सारे मिळोनी तियेतें ॥
नमूनी स्वयें प्रार्थिती राजमाते ॥
करावें प्रजापालना शोकत्यागी ॥
सती ताप वारूनि ती धन्य स्वर्गी ॥ ६२ ॥
किती शोक केला तरी नाच ये ती ॥
करावें तुवां राज्य तें स्वस्थ चित्तीं ॥
अशी प्रार्थना ऐकुनी ती जनाची ॥
स्वयें सिद्ध झाली करी राज्य तेंची ॥ ६३ ॥

---

## राज्यवर्णन.

श्लोक ( चामर )

त्या सतीस मालिराव पुत्र एक शोभला ॥
पेशव्यांस योग्य तोच राज्यस्थानिं भासला ॥
दुष्ट गूण त्यास फार लागले अपार, तो ॥
आस दाखवुनी फासिं गुंतवी जनास तो ॥ ६४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

श्लोक ( भुजंगप्रयात )

अहल्या सती पुत्र तो माल्हिराव ॥
तया देत वस्त्रें अणोनी सचीव ॥
करी राज्य तेथेंचि तो अल्प काळ ॥
नऊ मास होतांचि त्या नेत काळ ॥ ६५ ॥

श्लोक ( वसंत तिलका )

मृत्यूच येत स्वसुता अवलोकिजेला ॥
दुःखीच होय बहु ती अठवोनि लीला ॥
चिंता तियेसि पडली सचिवासि सांगी ॥
राज्यासनीं वसवुं कोणचि या प्रसंगीं ॥ ६६ ॥

आर्या ( गोति )

त्या सचिवेंचि कळविलें, द्यावा हो दत्तक स्वस्नुषांकीं ॥
ऐसें मि योजिलें मनिं, तें होइल मान्य सर्वथा लोकीं॥६७
त्या सचिवाचें उत्तर, ऐकुनि अहल्या ह्मणे गा आर्या ॥
मल्हारीचे राज्यीं, आहें मीच मुख्य तत्सुत भार्या ॥६८॥

श्लोक ( वसंत तिलका )

मंत्री तसाचहि गंगाधर येशवंत ॥
जो शाहणा चतुर नित्यचि येशवंत ॥
त्यानेंच युक्ति वदली रघुनाथ रावा ॥
कीं हेंच राज्य अपुलें हुकुमींच ठेवा ॥ ६९॥

तो श्रेष्ठ वीर रघुनाथचि हो शहाणा ॥
देतोचि युक्ति सचिवासचि नित्य जाणा ॥
ती हीच युक्ति परिसोनि समस्त लोकां ॥
नांहेच मान्य, तिजला मग अहिलेकां ॥७०॥

आर्या ( गीति )

जैसें येइल माझे, ध्यानीं तैसेंचि करीन मी आतां ॥
यांतचि न वदावें गा, कोणिही त्यासि नाहीं हो सत्ता॥७०
ऐसें त्यांतें उत्तर, देउनि ती साध्वि स्वयें करी कार्या ॥
पुण्यपत्तन ग्रामीं त्या, प्रेषि लेख श्रेष्ठ माधवा आर्या ॥७२
त्या माधवें नरपतें, जाणुनी भाव सर्व अहिल्येचा ॥
देतो तीसचि आज्ञा, तो सत्य धर्मच्युत नव्हेसाचा॥७३॥

ओवी

जो येइल आपुले ध्यानीं ॥
त्यासचि बैसवावें सिंहासनीं ॥
स्वराज्याची आपणचि स्वामिनी ॥
सर्वया इतरीं न विसंबावें ॥ ७४ ॥

श्लोक ( वसंत तिलका )

आणीक तो नरपतींहि तसीच देत ॥
आज्ञा तया रघुपतीसचि मानवेत ॥
तुझा नसेचि अधिपत्य तयाचि राज्यीं ॥
आहेच ती चतुर शाहणि दक्ष राज्यीं॥७५॥

श्लोक ( विद्युन्माला )

दादानेंची केली ऐसी ॥ गंगारामीं त्या मंत्रीशीं ॥
युक्ति द्रव्य प्राप्ती खाशी ॥ मीही येतों संग्रामासी॥७॥

आर्या ( गीति )

ऐसी ऐकुनि कीर्ती, धनलोभें राघव वदे तो तीस ॥
द्यावें धन बहु मजला, किंवा यावें स्वयेंचि लढाईस ॥७७

ओवी

ऐकुनी दादाचे प्रश्नासि ॥
देती उत्तर अहिल्या कैसी ॥
सांगतों आतां विस्तारेशीं ॥
सावधान चित्ता होइजे ॥ ७८ ॥

---

## राघोबादादाशीं शौर्याचें भाषण.

आर्या ( गीति )

आपण ब्राह्मण भिक्षुक, यावें धर्मार्थ माझिये सदना ॥
तेव्हां मी उदकासह, अर्पिनचि संग्रहीं असेल धना॥७९॥

श्लोक ( मणिबंध )

राघव रायाला वदली ॥ मी अबला काया निबली ॥
जाणुनी ऐशा हीनपणा ॥ कां मज पाचारीत रणा ॥८०॥

आर्या ( गीति )

दादा तुह्मीं आतां, संग्राम करणार काय अबलेशीं ॥
शास्त्रीं अबला अवध्य, जाणतसां शास्त्र नीति ज्ञानाशी
॥ ८१ ॥

अबलेवर शस्त्र धरी, तोही नच होय प्राप्त कीर्तीला ॥
दुष्कीर्ति होय त्याची, जाणतसे बालवृद्ध न्यायाला ॥८२॥
जरि मी होय पराभुत, तरि मजकडे नयेचि दोष धांवूनी॥
होई तद्वीपरितचि, मग काय वदेल तुह्मा जन पाहूनी॥८३

दिंड्या

सर्व ठाईं लौकीक तुझा आहे ॥
कीं तूं शूर रघुनाथरावपाहे ॥
त्यासि आणतोसि कलंक मज वाटे ॥
येइ संग्रामा मीच तुला भेटे ॥ ८४ ॥

दिल्ली अटकेसी झेंडे लावणार ॥
तूंचि आहेसि हो युद्धिं चतुर फार ॥
ऐकुनि तो तव ही नाम संघात ॥
स्त्रिया धेनूंचा होतो गर्भपात ॥ ८५ ॥

अशा अबलेशीं तूंही झुंजणार ॥
पाहीं आतांचि युद्धीं चमत्कार ॥
आजवरी तुवां मिळविलें यश फार ॥
दावि दावि मजचि आतां युद्धचतुर ॥८६॥

श्लोक ( भुजंगप्रयात )

बहू वाटते एक चिंता मनाला ॥
रणीं भीडतां नारिसंगें नराला ॥
नव्हे कीर्ति त्याची जरी प्रौढ झाला ॥
वरी आपकीर्ती तयाच्या कुळाला ॥ ८७ ॥

जरी हारवीलें स्त्रियेनें नराला ॥
तरी या जगीं व्यर्थ जीणें तयाला ॥
ह्मणोनी तयासी कळाया सुजाणा ॥
निरोपास धाडी ह्मणे ती सुजाणा ॥ ८८ ॥

धरी धीर चित्तीं तसें शस्त्र हातीं ॥
मुखीं रामनामा जया साधु गाती ॥
करी निश्चयो सैन्य मारावयाचा ॥
रघूनाय तो प्राप्त होईल साचा ॥ ८९ ॥

आर्या ( गीति )

ऐसे सोडुनि शब्दचि, वाण मगहि करीं धरीच तो शस्त्र ॥
आपणा समान सजवि, देउनि दासींच्या करीं तें अस्त्र ॥
॥ ९० ॥

ऐशा सेनेसहितचि, जाउनी ती सिद्ध करायासि रण ॥
पाहुनी स्त्री सेना ती, दादाचे जनही येतसे शरण ॥९१
कीं समरीं स्त्री वधणें, पातक मोठें असेंचि मानावें ॥
ऐशी युक्ती करुनी, येणारी तिस कसें न वानावें ॥ ९२ ॥

ओव्या

ऐसा करूनि पूर्वापार विचार ॥
मग येइ संग्रामा तूं नरेश्वर ॥
मीही येईन तुज समोर ॥
युद्ध चमत्कार दावावया ॥ ९३ ॥
ऐसें ऐकुनि तिचेचें उत्तर ॥
राव झाला मनामाजी चूर ॥
कोमेजला तयाचा नूर ॥
तेथुनी मागें परतला ॥ ९४ ॥

---

# राज्यवर्णन.

आर्या ( गीति )

धन्या सती अहल्या, रक्षी ती स्वशूर कुल नामातें ॥
जैसा कपिवर हृदयीं, ध्याय सदा तो सुरामनामातें ॥९५॥

श्लोक ( मालिनी )

कुशल ममत साध्वी ते परिक्षा जियेसी ॥
त्वरित समजलें राज्यीं नसेची तियेसी ॥
कवण निपुण त्या पागाधिकाऱ्या विनाहो ॥
ह्मणुनि जन तियेचे वर्णिती बुद्धिसीहो ॥ ९६ ॥

मग निवडित ती हो त्या तुकाजीस जाणा ॥
अति चतुरहि जो पागाधिकारी सुजाणा ॥
प्रथम वदत त्यासी तूंचि सेनाधिकारी ॥
मग करित तयासी सर्व राज्याधिकारी ॥ ९७ ॥

---

# तुकोजीस उपदेश.

आर्या ( गीति )

स्नुषाहि मल्हारीची, नाम अहल्या सतीस त्या साजे ॥
राज्य तुकोजिस देउनि, न्याय नितीचीं स्वयें करी काजें॥
॥ ९८ ॥

तुह्मासि हो कथितें, ईश्वरभजनींच रत असा नेहमीं ॥
कोणी मग नाहीं ते, करणार अवमान वदत सत्य मी॥
॥ ९९ ॥

जी दुष्टबुद्धि तीतें, त्यागुनि सद्बुद्धितें सदा आचरा॥
होईल ती प्रजा मग, सत्य कथित मी हो युष्मदनुचरा ॥
॥ १०० ॥

लवकर तो न्याय करा, तिष्टत ठेवूं नकाचि कोणाहो ॥
करा स्वप्रजा पालन,ही मम आज्ञा तुह्मांसि मान्याहो ॥
॥ १०१ ॥

रक्षावे गोब्राह्मण, तैसें दृढतरचो हिंदु धर्मासि ॥
परधर्मरत इतर जरि, तरि त्यांच्या नका वारु धर्मासी ॥
॥ १०२ ॥

## श्लोक ( मालिनी )

स्मरतचि उपकारा तो तियेचे सदाही ॥
नचकरि अवमाना ते अवज्ञा कदाही ॥
वडिलहि तिजपेक्षां मानि माते समान ॥
नकरि कवण कार्या हो सदा तीज वीण ॥१०३॥
समजत अपुला हा तो असे धर्म साचा ॥
ह्मणुनि करि तियेसि वुष्टही नम्र वाचा ॥
वदतिजनहि प्रेमें त्यासि मल्हार सूत ॥
तदपि परि तियेचे तो हुकूमीं रहात ॥ १०४ ॥

## श्लोक ( भुजंगप्रयात )

तुकाजीच लक्षीत सैन्यादि कामा ॥
करी शेष कामें अहल्या सुरामा ॥
जरीहो तुकाजी असे अन्य देशा ॥
लिखीतीं पुसेतो तिर्ते ऊपदेशा ॥ १०५ ॥
सुवासीक पुष्पा जरा सूत्र लागे ॥
तरी तें चढे मस्तकीं त्याहि संगें ॥
तुकाजी शहाणा अहल्या सुसंगें ॥
चढेना कसा लौकिका हो निजांगें ॥ १०६
तुकाजीच वर्ते स्वदेशीं हि कामा ॥
करीती अहल्या सदा राज्यकामा ॥
करी न्याय नीति सदाचारिणी ती ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



असे भाव तीचा प्रजेचेच हीतीं ॥ १०७ ॥
तिचें सैन्य संदी सदा तेंच जाणा ॥
तयावीण राखी न खाशी हि सेना ॥
परी जें असें सैन्य तेंहीच वाना ॥
न कोठेंहि युद्धीं असे तत्समाना ॥ १०८ ॥

श्लोक ( मंदाक्रांता )

अन्यायाचाहि नसत कधीं लेश राज्यीं जियेचे ॥
सैन्याचाही तरि असतहो तो बराची तियेचे ॥
बंहोबस्त, ह्मणुनि अरि तीतें नसे कोणि जाणा ॥
दंगे तेही न दिसति कदा हो तियेसीच वार्ता ॥१०९
घेई ती हो निमित करा आणि राखी इनामें ॥
ऐके अर्जांसि न कधि करीती निकाला स्वनामें ॥
पंचांसी तेच वदत करा त्याहि कार्यासि जाणें ॥
कांहीं मोठेंच असत तरीही स्वयें भेट घेणें ॥११०॥
राजाचा हाचि असत खराधर्म जाणा जनाहो ॥
निःपक्षपाति जरिंनच पापीं सदा तोच नाहो ॥
तैसेंची ती समजत मनीं न्याय तो सत्य योजी ॥
कंटाळे ना जरि तिज पडे शोधही अल्प काजीं १११

आर्या ( गीति ॥

जरी नसतीं राज्यींहि, काजें बहुत ह्मणुनि उरला जो वेळ॥
खर्ची ईश्वर भजनीं, ती परमार्थ परायण साध्वि ती काळ ॥११२॥

श्लोक ( उपेंद्रवज्रा )

सचीव तीला जरि देत कांहीं ॥
कठोर कामा मत कोणतेंही ॥
हुकूम आज्ञा नच प्राण घ्यावा ॥
हिशेब द्यावा मग काय देवा ॥ ११३ ॥

---

# तिचा वर्तनक्रम.

आर्या ( गीति )

ऐका कथितों नित्यचि, वर्तनक्रमासिहो अहिल्येचे॥
प्रात:काळीं उठोनि, करी ईश्वरस्मरणनाम वाचे ॥ ११४॥

श्लोक ( इंद्रवज्रा )

स्नानासि जाई मग ती सुशीला॥
देवाचिया नंतर ही पुजेला ॥
पोथीहि ऐके करि नित्य दानें ॥
नेवाचयासी लवलाहि जाणें ॥ ११५ ॥
ज्ञाती तियेची जरि शूद्र जाणा ॥
मांसादि आहार कदा करीना ॥
मद्यासि तीही नच सेवि साचें ॥
जें शुद्धची भोजन हो तियेचें ॥ ११६ ॥

ललित

भोजनासि हो करुनि ती सती ॥
स्तोत्रपाठ तो करितची स्तुती ॥
वामकुक्षिही मग करीत ती ॥
मागुतीच हो उठतसे सती ॥ ११७ ॥

आर्या ( गीति )

पोशाख मग करूनि, जाई ती तीस घटिका दिवसास ॥
पहावया स्वकामींहि, परते मागुति सूर्यास्त समयास ११८
पुढती घटिका आठहि, खर्चि भक्ती आणि अल्प आहारास
परते मागुति त्वरितचि, कामें काजें पहाया दरबारास॥ ११९
राहे घटिका आठहि, पाहे पुन्हा ती स्वराज्य कामांसी ॥
नंतर घेई निद्रा, ऐसें विभागि रात्र आणि दिवसासी ॥
॥ १२० ॥

आर्या ( उद्गीति ॥

व्रतें दानें उत्साह, होती बहुत राज्यीं तियेचे ॥
ऐसे रीतीं तीही, वर्षें त्रयोदश राज्य करी साचें॥ १२१

---

# गुणवर्णन.

श्लोक ( चामर )

शत्रुचा नसे कधींहि वाव जाणगावरें ॥
बंडतें करीन कोणि बाहि हें असें खरें ॥

एक वेळ शत्रु बंड पंधरा दिना करी ॥
त्यासवेंहि युद्ध होउनी पराभवी अरी ॥ १२२ ॥

श्लोक ( पृथ्वी )

सुबुद्धि बहु चांगली सतत वर्तना त्या करी ॥
तितें गमत जो असे जरि भला भली ती तरी ॥
लुटारु जरि भासला करित शासना त्यासहो ॥
ह्मणूनि नच बंड तें घडत हो कदा जाणहीं १२३

आर्या ( गीति )

गोविंदपंत गानू, जाणा हेंचि नाम हो सतत ज्यासी ॥
प्रामाणिक बहु भलाहि, मुख्य कारभारी सर्व ह्मणत त्यासी
॥ १२४ ॥

आर्यागीति

नेमिले तेची असत, जे न बदलति कदाहि कारभारी हो॥
मज भासत सत्य असे, कीं राज्य तिचें सज्जनांसि उत्तम
हो ॥ १२५ ॥

श्लोक ( मालिनी )

सकल जनहि देती नाम इंदूर ज्याला ॥
करित सति तयाला राजधानी विशाला ॥
प्रथम असत तेंहो ग्राय खेडें लहान ॥
प्रियकर बहु ती तें लोक बाळा समान ॥१२६॥

नवल गमत तीच्या त्या कृपाळू पणाचें ॥
वदति जन कथीतों जें अचंबीत साचें ॥
वसतचि परिसाहो तो तुकाजीस सेना ॥
नजिक असत तेंची ग्राम इंदूर जाणा ॥ १२७ ॥

दिंड्या

तया ग्रामीं वसत एक धनिक थोर ॥
तयाची ही कीर्ति असे योग्य फार ॥
देवीचंद असें नाम तया साजे ॥
धर्म पुण्य रतचि ह्मणुन जनीं गाजे ॥ १२८ ॥
वंशीं नाहीं संतान त्यास कांहीं ॥
ह्मणुनि करी चिंता तोचि लवलाही ॥
अपुं कवणासि द्रव्यें अपरमीतें ॥
कवण राखि मम धर्म दान व्रतातें ॥ १२९ ॥
अशी चिंता करित तो मनीं राहे ॥
पत्नि त्याची ती चरण सेविताहे ॥
तंव अकस्मातचि त्यासि मृत्यु आला ॥
पत्निजन तयाचा तोचि व्याकुळला ॥

श्लोक ( वसंततिलका )

हें वर्तमान कळलें नरसिंह राया ॥
कीं द्रव्य फारचि असे ह्मणुनीच, राया ॥
सांगीतलें कवण दुष्ट जनीं तयाला ॥
मानी मनीं सकळ तें अणवूं गृहाला ॥ १३१ ॥

साक्या

ऐसें ऐकुनी धनिक पत्नी स्वयें महेश्वरीं जाय ॥
कळवुनि त्या सती साध्वी लागी रडे मोकलुनी धाय १३२
जैसी कन्या श्वसुराहुनी ती दुःखी मातृ गृहिं जाय ॥
माते लागीं सांगती दुःखें ते करुनि हाय हाय ॥ १३३ ॥
ऐशा ऐकुनि वृत्तांताला साध्वी दुःखी झाली ॥
ह्मणत हरहर ईशा कैशी नृपा बुद्धि ही झाली ॥१३४॥
खळखळ नेत्रांतुनि अश्रु टाकुनि मुखश्री कोमेली ॥
हरहर ईशा कैसी आशा त्यानरधीशा झाली ॥१३५॥
कोण्या दुष्टें राजालाही पापबुद्धि कथियेली ॥
हरहर ईशा त्या नरधीशा कैसि आशा उपजली १३६
माझे मागें कैसे करतिल राज्याच्याहि रक्षणा ॥
कैसे पाळतिल प्रजा जनहे तैसेचि गोब्राह्मणा ॥१३७

आर्यागीति

धनिक स्त्री समजावुनि, सांगे अहल्या सति साध्वी
तियेला ॥
जावें स्वस्थानाप्रति, चिंतारहित करिन मी तव
कार्याला ॥ १३८ ॥

श्लोक ( शार्दु० वि० )

लेखातें मग ती लिही कठुर त्या राजी शिपाई जिये॥
आज्ञा त्याहि तुकाजिसि करुनि हो दूतासि धाडी

स्वयें ॥ बुद्धि ती त्यजणें कधीं न विवर्णे द्रव्यासि ग्रामांतया ॥ तुह्मी दूर रहा सर्वोंचि अपुल्या घेऊनि सैन्या तया ॥ १३९॥

दिंडी

बाई तूंची आहेस कुलिन सत्य ॥
जाणतसें मी हें सर्व राजकृत्य ॥
पति धनाची तूंचि अससी स्वामिनी ॥
कवण तूंतें अडवितो जाच मौनी ॥१४०॥

आर्या ( गीति )

धनिक स्त्रीच्या काजा; वरुनी ह्मणत जन हि भली रे भली ॥
आह्मा प्रजा जनांसी, द्याया हो सौख्य काय अवतरली ॥१४१॥

दिंडी

तिचे राज्यीं असत अल्प संस्थानें ॥
खंडणी देतची अणुनि नियमानें ॥
कधिं नाहीं कोणी करित अपमाना ॥
योग्य शिक्षा द्याच माना प्रमाणा ॥१४२॥

श्लोक ( भुजंगप्रयात )

सदा हेतु हाचि तियेचे मनांत ॥
प्रजा आपुलीही असावी सुखांत ॥
सदा प्रीति तीसी प्रजेच्या सुखाची ॥
करी युक्ति तीही जनाच्या हिताची ॥१४३॥

दिंडी

धनिक व्यापारी तेचि सुखी होती ॥
स्वकार्यें अपार द्रव्य मेळवीती ॥
कृषिकर्मी रतहि सौख्य पहाती ॥
नाहिं कवणा राज्यींच ती दधाती ॥१४४॥

श्लोक ( शा०वि० )

लोकांचें जरि वाढलें धन तरी नाहींच घे ती करा ॥
न्यूनाधिकाहि, होतसे जनकरें उद्योग तोहि बरा ॥
झाले फार धनीक लोक ह्मणुनी मानींच संतोषती ॥
होई तत्पर फार रक्षण करी द्रव्येंच ती हो सतो१४५
भिल्लादी जन चोरटे बहुत ते राज्यीं तियेचे खरे ॥
त्यांच्याशींहि करी तहास परिते सौम्यें कदा नावरे ॥
जाणूनी मग तीव्रही करित ती शिक्षा त्वरेंचि तयां॥
ऐशा रीतिं न थांबतां सरळ ती मार्गासि लावी तयां॥
॥ १४६ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात )

तिचे घाटमार्गीं सदा माल जाई ॥
परी थोडक्या ती करासीच घेई ॥
वहीवाट जाणा जुनी जी असे हो ॥
करी मान्य तीही खरी जी सदा हो ॥१४७॥

आर्या ( गीति )

जे भिल्ल राखिति मार्ग, त्यांसचि देत असे भूमी ॥
मार्गीं होतां चोरी, भरुनि घेईन स्वयें ती मी ॥१४८

दिंडी

अहल्या बाइची राज्य रीति थोर ॥
करूं वर्णना तरि ग्रंथ होय फार ॥
ह्मणुनि कथितोंची एक रीत साची ॥
असे नियमांसी योग्य रीति तीची ॥१४९॥

आर्या गीति

ऐकुनि साती नियमांसी, झाले तत्पर राव डोलविती
माना ॥
कोणी तद्रिति कथितां, न करिती हो थोर थोरहि
वरमाना ॥१५०॥

अद्यापि त्याहि रीती, चालती मालवदेशींच हो जाणा
न करिति जन अवमाना, साध्वीची रीति सर्व मनीं
आणा ॥१५१॥
ब्राह्मण द्वारें ठेविति, पत्र व्यवहार तोंचि सर्व राजांसी॥
पाहुनि सुवर्तनासी, देताचि मान सर्व प्रजा नृप तियेसी
॥ १५२ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात )

कुठें धर्मशाळा कुठें पाणपोई ॥
कुठें अनसत्रें करी सर्व ठायीं ॥
अशा धर्मकृत्या सदा ती भुकेली ॥
किती सांगु मीही द्विरुक्तीच झाली ॥ १५३॥

साक्या

मालवदेशीं सर्व ठायीं केले हो अवघड दूर्ग ॥
साध्य होण्यालागीं ते शत्रुसी वाटति अति दूर्ग१५४
ठायीं ठायीं ती साति डोंगर फोडुनि रस्ते बांधी ॥
देवालयें धर्मार्थचि शाळा कोठें घाटही बांधी
॥ १५५ ॥
उष्णीं पाजी जल ती साध्वी वस्त्रें वांटी शीतीं ॥
करूनि ऐशा परोपकारा जनसौख्या योजी ती ॥
॥१५६॥

### दिंडी

कृषि कर्मीं जरि ते थकति वृषभ फार ॥
म्हणुनि तियेनें ही ठेवियले चार ॥
दूत हस्तें ती त्यांसि उदक पाजी ॥
पक्षियांसी ही योग्य धान्य योजी ॥ १५७ ॥

### आर्या ( गीति )

त्रिंशति वर्षे केलें, राज्य तिनें धर्मन्याय नीतीनें ॥
पाळी प्रजाजनांतें, जननि जशी बालकासि प्रीतीनें ॥१५८

### श्लोक ( शार्दूल विक्रीडित )

साध्वी ती सदयाचती गुणवती पातिव्रता साधुनी ॥
मृत्यूचे समयींच होय कृश ती चिंतानळें भाजुनी ॥
साठावें बसतांचि वर्ष तिजला संपादुनी प्रीति ती ॥
स्वर्गासी मिळवूनि कीर्ति स्वजनां रक्षूनिही जातती १५९

### श्लोक ( पंचचामर )

नसेचि ती बहूत उंच ठेंगणी नसे, कधीं ॥
न होय तीज पासुनी अलस्य तो यशीं, सुधी ॥
करी उपास फारची म्हणूनि होय बा शुष्कती ॥
नसे बहूत सुंदरा परि मुखीं दिसे तेज ती ॥१६०

श्लोक ( रथोद्धता )

रंग श्यामल असेच साजिरा॥
पादहीं मृदुचि हस्त गोजिरा ॥
नेत्र चंचल दिसे मृगाजिता ॥
पाहतांचि सुख होय तत्वतां ॥ १६१॥

श्लोक ( शार्दू० वि० )

कोणी दुष्टपणा अनीति करितां साहेन तीतें कधीं ॥
जेव्हां क्रोधवतीच होय सति ती पुढें धजेनाहि धी ॥
कोणाची, तिस पाहतांचि समयीं हो कंप शूरां प्रती ॥
विद्यादीकहि सर्व राज्य नियमीं निष्णात स्त्री हीच ती ॥
॥१६२॥

आर्या ( गीति )

असुनि हि तरुण स्त्रीती, कधींहि न करीच डामडौलातें॥
असे स्वधर्म रत सदा, न करीच परि पर धर्म द्वेषातें ॥
॥ १६३ ॥

आर्या गीति

तरुणपणींहि वैधव्य, परि ती जतन करीच पातिव्रत्यातें ॥
जैसा कदर्यु जपतो, दिनरात संग्रहीं असेल द्रव्यातें॥१६४

आर्या ( गीति )

लक्ष्मीवती होय जरि, तरि तिजलाहि न शिवे अहंकार ॥
वाटे गौतम जाया, आली काय धरुनि हाचि अवतार१६५

साक्या

एके दिवशीं एके विप्रें आणियलें ग्रंथासी ॥
वर्णन करुनी तिचे गुणांचें ठेविलें तत्सभेसी १६६

त्यांतिल सर्व हेतू जाणुनी नये तो तिचे मनास ॥
मग ती आज्ञा विप्रां देकीं अर्पावांचि गंगेस॥१६७

ईश्वरसेवा सोडुनि कैसे नरस्तुतिस भुललारे ॥
तशांत मीही पापी अवला राज्यांतीहि असुखरे
॥१६८॥

धनलोभास्तव अवलंबीतां तुह्मी नर स्तुतीतें ॥
परंतु तें मज संमत नाहीं द्रव्य तुम्हां अर्पीतें १६९

श्लोक ( शार्दु० वि० )

नाहीं देखिलि म्यां अशी कलियुगीं साध्वी जनीं दूसरी॥
रूपें शामलसी यशें अमलसी धैर्यें नगाच्या सरी ॥
शौर्यें शूर जशी गुणें सुगुणशी दात्यां यशोहार ती ॥
बुद्धीनें बुधसी जनां सुरभिसी होती अहल्या सती॥१७०

श्लोक ( पृथ्वी )

तिची सरणि नायकों कलियुगीं दुजी चांगली ॥
प्रजा अवन प्रीतिनें करि निती नयानें भली ॥
स्वधर्मि रत सर्वदां भजतसे द्विजांच्या पदा ॥
अपार धन संपदा परिहि ती न भोगी कदा ॥१७१॥

श्लोक ( शिखरिणी )

स्वतां वागे न्यायें आणिकहि जनीं निर्मळ अशी ॥
परांचे दोषांसी न गणिच कधीं नाहिंच तशी ॥
गुणात्यागी, व्यंगासिच सति ति आच्छादित असे ॥
अहो साध्वी रामा जगिंच दुजी ऐसी नच दिसे॥१७२

श्लोक ( शार्दू० विक्रीडित )

गेले या अवनीवरि बहुत ते होऊनि नारीनर ॥
होते सज्जन पापभिरु बहु ते त्यांमाजी अग्रेसर ॥
झाली हीच सती असें गमतसे माझेच चित्तीं नती ॥
सर्वांही परदेश वासित जनां मान्याच होते सती ॥१७३॥

श्लोक ( चामर ]

ईश्वरीं धरूनि भीति वागलीच ती सती ॥
सज्जनांची पंक्ति ती मध्यें पहीलि ओविती ॥
लोक, झाली सुतरी भवोदधींच राहुनी ॥
दानधर्म करी तीर्थ पुण्य पाप वारुनी ॥ १७४॥

श्लोक ( कामदा )

चरित फार हें दीर्घ जाहलें ॥
परिही तें मला योग्य वाटलें ॥
ह्मणुनि मी करी वर्णना तिच्या ॥
मर्नाह हें रमे वर्णनीं जिच्या ॥ १७५ ॥

फिरत मी सदा वाळुचे रणीं ॥
नयन पीडिले त्या रजःकणीं ॥
नसत ही कुठें योग्य तें स्थळ ॥
ह्मणुनि मानितों हेंचि सुस्थळ ॥१७६॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित )

साध्वीचीं सुमनोहरें चरित तीं नेत्रां बहू मानलीं ॥
संतापा हरुनीच शीतल करी तेथेंचि हे थांबले ॥
झाले थंडचि नेत्र फार, ह्मणुनी स्थाना न सोडी कदा
जैसा याचक द्रव्यप्राप्ति करितां दात्या न त्यागी सदा ॥
॥१७७॥
ऐसा तोंचि अमानुषीक करुनियां लौकीक गेली सती ॥
वर्णावी किति कीर्ति वर्णनिंच हो खुंटेहि माझी मती ॥
या भूमीवरि ठेवुनीच सति ती अक्षय्य नामावली ॥
घेते सर्वहि ते न हिंदुजनही म्लेंच्छादिकीं वर्णिली १७८

आर्या गीति

पूर्वी मुंबा पुरिं तो, होता अधिकारी मालकम या नांवें ॥
केलें त्यानें वर्णन, स्वभाषेंतच्चि देखुनि तोष जन पावे ॥
॥१७९॥
त्याच केलें गद्यचि, त्या योग्य कृष्णशास्त्री विद्वानानें ॥
हें पद्यरूप त्याचें, करितसें मीच हो सज्जनाश्रयानें॥१८०

साक्या

कोठें येइल द्विरावृत्तिही सतीच्या गुण वर्णनीं ॥
कोठें येइल अशुद्धावलि ती राज्यनीती वर्णनीं १८१

ऐसे येतिल दोष बहु परि त्यागावे सज्जनानें ॥
गुण ग्रहण करावे कथितों हंस क्षीर न्यायानें ॥ १८२ ॥

आर्या गीति

सत्राशें पंचाशित, गेली सती स्वर्ग मार्गावलंबूनी ॥
पसरुनि जगिं सत्य कीर्ति, सज्जनहि धरो तोच मार्ग पाहूनी ॥१८३॥

श्लोक ( शार्दूल विक्रीडित )

पहावें जंव ऐतिहासिक कथा झुंडीच त्या दीसती ॥
दुष्टांच्या, तंव फारची क्रूरहि अप्रामाणिका वर्तती ॥
नाहीं हो कधिं सुष्टु संतति नृपां न प्राप्त राजगृहीं ॥
झालीवा तरि पद प्राप्त न तया अल्पायुषी जन्मही॥१८४

आर्या ( उपगीति )

ह्मणुनि सतिचे वर्णनीं, मम मानस फार रमलें हो ॥
पाहुनी सज्जन यासि, आपुलि कंधरा डुलवो हो ॥१८५॥

आर्या गीति

अहल्यासति वर्णना, सम नाहीं प्राप्त वर्णन या धरित्री ॥
मग कैसें न सुदुर्लभ, होय हिंदुजन ऐतिहासिक चरित्रीं ॥१८६॥

दिंडीं

अशी साध्वी ती होय हिंदुस्थानीं ॥
ह्मणुनि झालों जन सर्व अभीमानी ॥

जिनें शोभविलें अस्मदितीहासा ॥
तिचे वर्णनिं मो हो पावन खासा ॥१८७॥

श्लोक ( भुजगप्रयात )

अहाहा किती शांत जन्म स्वभाव ॥
अहाहा किती वेदधर्मांत भाव ॥
अहाहा किती वर्तनीं कृत्य साधें ॥
अहाहा न कां कीर्ति मुक्तीहि साधें ॥१८८॥

आर्या ( गीति )

अन्य जनांहीं त्यागिलिं, दानधर्मादिव्रतेंही संपूर्ण ॥
तद्धारणार्थ विधिनें, वाटे हें निर्मिलें हो शशिवदन ॥१८९
किंवा पातिवृत्ता, वसण्यालागी नसे दुजें स्थान ॥
ऐसा चिंताकुल विधि, निर्मी जणु हेंचि काय शशिवदन ॥१९०॥
किंवा परोप कृतिचें, ब्रम्ह्यानें निर्मिलें हेंची सदन ॥
प्रतिमा नरदेवाची, धरणीं हें भासतें शशिवदन ॥१९१॥
किंवा पातकपंकीं, निमग्न लोक द्विजांसि समुद्धरिन ॥
ऐसें चिंतुनि भूवरि, अवतीर्ण झालेंच काय शशिवदन ॥१९२॥

आर्या (उद्गीति)

किंवा निजजन भूषण, निजजनपद कुबुद्धिचें कदन ॥
सदन सुविद्येचें जें, नित्यजनांसि प्रीतिपात्र शशिबदन१९३

अभंग

ऐसे गूण कीर्ति वर्णन मी करूं ॥
अज्ञान लेंकरूं होवोनिया ॥
परि तेंचि अल्प करीतों कथन ॥
अलस्य निरसून जाय माझा ॥१९४॥
यांत येति राशी दोषांच्या अपार ॥
परी कृपाकर सज्जनांचा ॥
बाळकृष्ण सूनु हरिश्चंद्र नांव ॥
नासो त्याचा भव ईश कृपें ॥ १९५ ॥

---

# वंशावली.

(आर्या) गीति

प्रथमचि तो मल्हारी, झाला निर्माण होळकर वंशीं ॥
ज्यानें मिळवुनि कीर्ती, आणियलें हेंचि स्वकुळ उदयाशी ॥ १९६ ॥

त्या मल्हारिस एकचि, होत सुत खंडेराव या नांवें ॥
जो अल्पकाळ सौख्यहि, भोगुनि पित्या समक्ष स्वर्ग पावे ॥ १९७ ॥

तद्भार्या अहल्याहि, होती सति पतिव्रता महाचतुर ॥
जीचें केलें वर्णन, मी मनिं चिंतूनि तोचि लंबोदर ॥ १९८ ॥

तत्सुत मालीरावहि, अति मूढचि ब्रह्मद्वेष करणार ॥
तो सुराज्यपद मिळवुनि, अल्पकाळीं होय स्वर्गवासकर
॥ १९९ ॥

पुढती ती सति साध्वी, राज्यपादें करि योग्य त्या तुकाजीस
ज्यानें शूरत्व करुनि, तोषविलेंचि परम सतिअहल्येस ॥
॥ २०० ॥

त्या तुकाजीस होते, राज्यरितिनंयनिपुण योग्य सुत चार॥
काशिराव मल्हार, तिसरा विठोजि यशवंत बहु शूर २०१
त्या मल्हारिस एकचि, होत सुत खंडेराव या नांवें ॥
जो युद्धीं पितयासह, पुण्यग्रामीं कारागृह पावे ॥ २०२ ॥
त्या यशवंतें कपटें, वधुनि काशिराव खंडेरावासी ॥
मेळविलें राज्यपदा, करुनि तुमुल युद्ध अंग्लभौमांसी ॥
॥ २०३ ॥

पुढती झाले दत्तक, ते मल्हारी मार्तंड या नामीं ॥
शोभवुनि स्व सिंहासन, मल्हारी होत मृत्यु पथगामी ॥
॥ २०४ ॥

मग राहेचि मार्तंड, करी राज्य तोहि इंदुरग्रामीं ॥
तेव्हां विजयी आला, हरिराव ह्मणत सत्य राज्यपति मी ॥
॥ २०५ ॥

तो हा औरस सत्यचि, युद्धचतुर बंधुसुत तुकोजीचा ॥
तो करुनि संग्राम तैं, करि पराभव मार्तंडरायाचा ॥२०६
तत्सुत हाचि तुकोजी, संप्रति शोभत राज्य पदींच असे ॥
करुणा युक्त दयाभुत, हो जनक शिशुपरि प्रजा पालितसे
॥ २०७ ॥

सत्सुत युवराजाग्रज, बाळासाहेब सुनाम यशवंत ॥
मम मानस इच्छी हें, कीं तो हो चिरायु नित्य यशवंत ॥
॥ २०८ ॥

यशवंतानुज द्वितियचि, सुत मल्हारी नाम ज्या साजे ॥
ज्ञान नीतियुत होउनि, बंधुपित्यासह स्वराज्यीं विराजे ॥
॥ २०९ ॥

आर्या ( गीति )

शुद्धाशुद्धा आर्या, आर्यांनीं ही असोतु अभिनंद्या ॥
अपभ्रंशित बाळाची, वाणी परि वाटतेच अनवद्या॥२१०

दिंडी

प्रार्थुनि विनवितों त्याचि जगत्पाळा ॥
कीं मम हेतु हा पुरावे दिनदयाळा ॥
होळकरांचें असो राज्य चिरकाळ ॥
करो त्यांचे जन आनंद कोल्हाळ ॥ २११ ॥

आर्या ( गीति )

या माझ्या अल्प श्रमा, सज्जन देवोत हेचि उदार कर ॥
मग होइन श्रम रहितचि, होइल तैसाहि मम श्रमहीनकर
॥ २१२ ॥

समाप्त.

# सूचना.

हीं पुस्तकें ज्या कोणास पाहिंजे असतील त्यांनीं खालीं लिहिलेल्या पत्यावर पोष्टपेड पत्रें पाठवून मागवावीं. पुस्तकांच्या किमती बद्दल तिकिटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा दराचीं तिकिटें वर्तावळयासह पाठवावीं, ह्मणजे त्यांस पुस्तकें तावडतोब रवाना करण्यांत येतील. याची किंमत चार आणे व प्रत्येक प्रतीस पोष्टेज अर्धा आणा पडेल. या शिवाय दहा प्रती घेणारास एक प्रत कमिशनादाखल देण्यांत येईल.

केशव चिटको कुळकरणी,
हेडमास्तर स्कूल माजगांव.
मुंबई, नंबर ७.